# Study Circle Career Development Institute

# AMC
# Paper 1998

**A**

**Time : 1 Hrs.** **Marks : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्याच विषयाचे प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आले आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

# AMC, MCGB, Examination Paper - 1998
## Screening Test

१) खालीलपैकी कोणते शासकीय नियंत्रण तंत्र महानगरपालिकेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वाधिक योग्य आणि लोकशाही स्वरूपाचे आहे ?

(1) मनपा मंडळ बरखास्ती
(2) महापौरांची बडतर्फी
(3) सल्ला व माहिती देणे
(4) स्थानिक कृतींसाठी पूर्वसंमतीची अट

---

२) खाली दिलेल्या जोड्यांपैकी जुळणारी जोडी शोधा –

अ) परिवहन व्यवस्थापक : राज्यसरकारकडून नेमणूक
ब) नगर अभियंता : सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नेमणूक
क) महापालिका आयुक्त : राज्यसरकारकडून नेमणूक
(ड) महापालिका आरोग्य अधिकारी : आरोग्यखात्याकडून नेमणूक

(1) (अ) (2) (ब) (3) (क) (4) (ड)

---

३) खालील विधान पहा – मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अकराव्या तरतुदीनुसार महापालिका सदस्याला खालीलपैकी कोणत्या कारणामुळे आपले सदस्यत्व सोडावे लागते ?

अ) अनर्हता धारण केल्यामुळे
ब) बैठकींना गैरहजर राहिल्यामुळे
क) चर्चेस व/किंवा मतदानास असलेल्या एखाद्या बाबीमध्ये स्वत:चे व्यावसायिक हितसंबंध असल्यामुळे
ड) वरील सर्व कारणे

(1) फक्त (अ) बरोबर आहे
(2) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत
(4) (सर्व बरोबर आहेत

---

४) महापालिका ...... आहे.

(1) खाजगी कंपनी (2) सरकारी खाते (3) विश्वस्त (4) वैध व्यक्तिमत्त्व

---

५) पद वर्गीकरणाच्या हेतूचा ...... शी संबंध नाही.

(1) पदोन्नती (2) अनुशासन (3) वेतन संरचना (4) प्रशिक्षण

---

६) खालील विधानांचा विचार करून तुमचे उत्तर निवडा –

**विधान :** ग्रामीण क्षेत्रात पंचायती राज स्थापन करण्यात आले
**कारण :** ग्रामीण क्षेत्रातील लोकांनी विकास कार्यात सहभाग दिला नव्हता

(1) विधान बरोबर पण कारण चूक आहे
(2) विधान चूक पण कारण बरोबर आहे
(3) दोन्हीही बरोबर आहेत
(4) दोन्हीही चूक आहेत

---

७) यादी–I ची यादी–II शी जुळणी करा. खाली दिलेले कोड वापरून तुमचे उत्तर तयार करा.

| यादी–I | यादी–II |
|---|---|
| A – महानगरपालिका | I – लहान शहरी क्षेत्र |
| B – मेट्रोपोलिटन क्षेत्र | II – तात्पुरते क्षेत्र |
| C – नगर परिषद | III – दहा लक्ष किंवा त्या पेक्षा अधिक लोकसंख्या क्षेत्र |
| D – नगर पंचायत | IV – मोठे शहरी क्षेत्र |

(1) A-III, B-II, C-I, D-IV
(2) A-IV, B-III, C-I, D-II
(3) A-I, B-III, C-IV, D-II
(4) A-III, B-I, C-II, D-IV

---

८) खालील विधाने विचारात घ्या –

**विधान (A) –** खरे पाहिले असता लोकप्रशासन ही उच्च प्रतीची कला आहे.

**कारण (R) –** लोकप्रशासनातून व्यक्तीच्या व्यवस्थापनाचे कौशल्य साधले जाते.

(1) A व R दोन्ही बरोबर आणि R हे A चे योग्य कारण आहे
(2) A व R दोन्ही बरोबर परंतु R हे A चे कारण नाही
(3) A खरे आणि R खोटे आहे
(4) A खोटे आहे R खरे आहे

---

९) यादी–I व यादी–II मधून जोड्या लावून पुढील पर्यायातून अचूक पर्याय निवडा.

| यादी–I | यादी–II |
|---|---|
| १) बौद्धिक क्षमता | अ) तोंडी |
| २) व्यावसायिक कौशल्य | ब) योग्यता (Aptitude) |
| ३) मानसिक कल | क) लेखी |
| ४) सामाजिक जाणीव | ड) कार्यमान (Performance) |

(1) १–ड, २–२, ३–अ, ४–ब
(2) १–क, २–ड, ३–अ, ४–ब
(3) १–अ, २–ब, ३–ड, ४–क
(4) १–क, २–ड, ३–ब, ४–अ

---

१०) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

७४ व्या घटना दुरुस्ती कायदा १९९२ ने महानगरपालिकेसाठी या प्रमाणे तरतूद केली आहे –

अ) अनुसूचित जातीसाठी राखीव जागा
ब) अनुसूचित जमातीसाठी राखीव जागा
क) स्त्रियांसाठी राखीव जागा
ड) महापालिका प्रशासनाचे खास ज्ञान असणाऱ्या व्यक्तीचे राज्याकडून नामांकन

(1) फक्त (अ) बरोबर आहे
(2) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत
(4) सर्व बरोबर आहेत

---

११) खालीलपैकी कोणते घटक नियंत्रण कक्षेवर प्रभाव टाकतात ?

(1) कार्यक्षमता आणि खर्च
(2) नियंत्रण आणि शिक्षा
(3) कार्यस्वरूप आणि संज्ञापन
(4) मागणी आणि पुरवठा

---

१२) ...... हे विभागीकरणाचे घटक आहेत.

(1) नियंत्रण, बढती, शिस्त
(2) बढती, बदली, बक्षीस
(3) परिणामकारकता, नियंत्रण, शिक्षा
(4) समन्वय, नियंत्रण, दक्षता

---

१३) ...... हा संदेशवहनाचा मूलभूत हेतू असतो.

(1) अनुमान विषयक माहिती पुरविणे
(2) आकडेवारी देणे
(3) माहिती पुरविणे
(4) संदेश देणे

---

१४) आधी खालील विधाने काळजीपूर्वक वाचा –

अ) अंदाजपत्रक म्हणजे व्यवस्थापनाच्या योजनेचा आर्थिक पैलू असतो
ब) अंदाजपत्रक हे नियंत्रणाचे साधन असते.
क) अंदाजपत्रके फक्त आर्थिक असतात
ड) अंदाजपत्रक कार्यमानाचे एक प्रमाण निश्चित करत असते

(1) (अ), (ब) आणि (ड) बरोबर आहेत
(2) (अ) आणि (ड) बरोबर आहेत
(3) (ब) आणि (क) बरोबर आहेत
(4) (अ) आणि (क) बरोबर आहेत

---

१५) समभाग बिंदू हा असा एक बिंदू असतो जेथे एकूण खर्च ...... इतका असतो.

(1) निव्वळ उत्पन्न
(2) निव्वळ नफा
(3) अपेक्षित उत्पन्न
(4) एकूण उत्पन्न

---

१६) आदेशाची एकसंधता या तत्त्वाचा अर्थ –

अ) कनिष्ठाने एका वेळी एकाच आदेशाचे पालन करावे
ब) वरिष्ठाला एका वेळी एकच कनिष्ठ असावा
क) कनिष्ठाला एका वेळी एकाच वरिष्ठाचे नियंत्रण असावे
ड) आदेश नेहमी लेखी असले पाहिजेत

(1) फक्त (क) बरोबर
(2) फक्त (ड) बरोबर
(3) (अ) आणि (ब) बरोबर
(4) (अ) आणि (क) बरोबर

---

१७) परंपरेने ज्यांना उत्पादक घटक मानले जाते त्या व्यतिरिक्त ...... या घटकास अत्यंत महत्त्वाचा उत्पादक घटक मानले जाते.

(1) नेतृत्व
(2) माहिती
(3) यंत्रणा
(4) संघटना

---

१८) आधी खालील विधाने काळजीपूर्वक वाचा –

अ) औद्योगिक क्रांती म्हणजे घरगुती उद्योगाऐवजी कारखानदारी हा बदल

ब) औद्योगिक क्रांती म्हणजे वाफेच्या इंजिनाऐवजी विद्युतशक्तीचा वापर हा बदल

क) औद्योगिक क्रांती म्हणजे मानवी श्रमाऐवजी यंत्राचा वापर हा बदल

ड) औद्योगिक क्रांती म्हणजे स्थानिक बाजारपेठेऐवजी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ हा बदल

(1) (अ) बरोबर (2) (अ), (ब) आणि (क) बरोबर

(3) (अ) आणि (क) बरोबर (4) (अ) आणि (ड) बरोबर

---

१९) संघटन तक्त्यावरून ...... लक्षात येत नाही

(1) अधिकार संबंध (2) व्यवस्थापन पातळी (3) अधिकार प्रदान (4) वरिष्ठ कनिष्ठ

---

२०) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) संचालनात वरिष्ठांना मार्गदर्शन आणि कनिष्ठांना पर्यवेक्षण यांचा समावेश होतो

(2) संचालनात कनिष्ठांना मार्गदर्शन आणि वरिष्ठांचे पर्यवेक्षण यांचा समावेश होतो

(3) संचालनात कनिष्ठांना मार्गदर्शन व त्यांचे पर्यवेक्षण यांचा समावेश होतो

(4) संचालनात वरिष्ठांना मार्गदर्शन व त्यांचे पर्यवेक्षण यांचा समावेश होतो

---

२१) बरोबर विधानांचा संच निवडा –

व्यवस्थापन विकासांचा हेतू साधण्यासाठी ...... आवश्यक आहेत.

अ) आवश्यक कौशल्ययुक्त, आवश्यक संख्येत व्यवस्थापकांचा पुरवठा करणे

ब) कर्मचाऱ्यांना निवासस्थाने पुरविणे

क) कर्मचाऱ्यांना कर्जपुरवठा करणे

ड) सर्व पातळीवरील व्यवस्थापकांच्या कार्यपालनात सुधारणा घडविणे

(1) फक्त (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत (2) सर्व विधाने बरोबर आहेत

(3) (अ) आणि (ब) बरोबर आहेत (4) (अ) आणि (ड) बरोबर आहेत

---

२२) प्रेरणा दिल्यामुळे ...... वाढते.

(1) वेतन (2) लोकप्रियता (3) कार्यक्षमता (4) कार्यनियंत्रण

---

२३) व्यवस्थापकीय निर्णय केव्हा परिणामकारक ठरतात ?

(1) जेव्हा ते तार्किक दृष्टीने सुसंगत व व्यवहार्य असतात

(2) जेव्हा ते शास्त्रीय माहितीवर आधारित असतात

(3) जेव्हा प्रशासकाची प्रवृत्ती वस्तुनिष्ठ असते

(4) जेव्हा निर्णय घेणाऱ्यांची संख्या अधिक असते

---

२४) समन्वय म्हणजे ......

(1) उच्च मनोबल राखणे
(2) समूहाच्या प्रयत्नांनी सुसबंद्ध रचना
(3) कार्यसमाधान मिळवून देणे
(4) दुहेरी संदेशवहन

---

२५) कार्यक्षम संदेशवहनामुळे ......

(1) सदस्यांना एकत्रित विचार करणे व कृती करणे शक्य होते
(2) समन्वय साधणे शक्य होते
(3) अंतर्गत आणि बाह्य घटनाविषयी सदस्यांना माहिती देता येते
(4) भावनिक वर्तनात वाढ करता येते

---

२६) प्रशासनात 'अधिकार' म्हणजे काय ?

(1) निर्णय घेण्याची संपूर्ण सत्ता
(2) संघटनेच्या धोरणांतर्गत निर्णय घेण्याची सत्ता
(3) कनिष्ठ कर्मचाऱ्यांना आदेश देण्याचे कार्य
(4) कर्तव्याची सुपूर्तता पण आबंधने टाळणे

---

२७) मानवी गरजा आणि अभिप्रेरण या सिद्धांतातील खालीलपैकी गरजांचा योग्य तो क्रम कोणता आहे ?

(1) मैत्रीविषयक, संरक्षणात्मक, मान्यताविषयक, जीवनावश्यक
(2) मान्यताविषयक, जीवनावश्यक, संरक्षणात्मक, मैत्रीविषयक
(3) संरक्षणात्मक, मैत्रीविषयक, जीवनावश्यक, मान्यताविषयक
(4) जीवनावश्यक, संरक्षणात्मक, मैत्रीविषयक, मान्यताविषयक

---

२८) नियंत्रण प्रक्रियेतील विविध पायऱ्यांचा योग्य क्रम असा आहे ......

(1) प्रमाण, कार्यमूल्यमापन, तुलना, सुधारक कृती
(2) कार्यमूल्यमापन, प्रमाण, सुधारक कृती, तुलना
(3) तुलना, कार्यमूल्यमापन, प्रमाण, सुधारक कृती
(4) सुधारक कृती, तुलना, कार्यमूल्यमापन, प्रमाण

---

२९) संघटनेचे मूलभूत घटक हे आहेत .......

(1) कार्यक्षमता, नीतिमत्ता, कार्यपद्धती
(2) उत्पादकता, शिस्त, नियम
(3) कार्यविभागणी, अधिकारस्त्रोत, कार्यसंबंध प्रस्थापना
(4) नियोजन, नियंत्रण, कर्मचारी नेमणूक

---

३०) ''अधिकारप्रदान म्हणजे दुसऱ्याकडे जबाबदारी सोपविणे'' या विधानासाठी पुढीलपैकी योग्य पर्याय निवडा.....

(1) बरोबर
(2) चूक
(3) बरोबरही नाही आणि चूकही नाही
(4) अर्धसत्य

---

३१) बेशिस्तीचे प्रमाण कमी करण्यासाठी रचनात्मक पायरी म्हणजे ......
(1) असमाधान काढून टाकणे
(2) नियंत्रण ठेवणे
(3) शिस्तीचे नियम तयार करणे
(4) बेशिस्तीच्या कारणांचे विश्लेषण करणे

---

३२) शिस्तीचा मुख्य उद्देश कोणता ?
(1) संघटनेच्या नियम व धोरणांना सभासदांची स्वयंमान्यता मिळविणे
(2) कमाल उत्पादकता व उत्पादन हे उद्दिष्ट साध्य करणे
(3) कामगारांमार्फत काम करवून घेणे
(4) मार्गदर्शन करून सहकार्य मिळविणे

---

३३) कार्यमूल्यमापनाची प्रक्रिया ...... याने सुरू होते.
(1) कार्यमूल्यमापनाचे मोजमाप
(2) प्रत्यक्ष कार्य व प्रमाण याची तुलना
(3) दुरुस्ती (सुधारक) कृती
(4) कार्याचे प्रमाण निश्चित करणे

---

३४) मनुष्यबळ नियोजनाची आवश्यकता पुढील कारणासाठी आहे ......
(1) कर्मचारी अधिक किंवा कमी आहेत हे पाहण्याकरता
(2) बढतीची शक्यता सुधारण्याकरता
(3) एकूण किती कर्मचारी आवश्यक आहेत हे पाहण्याकरता
(4) संघटनेची उद्दिष्टे गाठण्याकरता

---

३५) ''सांधिक भावना'' टिकवून ठेवण्याकरता ...... आवश्यक आहे.
(1) व्यावसायिक दृष्टिकोन
(2) नकारात्मक दृष्टिकोन
(3) मानवी संबंध दृष्टिकोन
(4) होकारात्मक दृष्टिकोन

---

३६) ''कामविशेष उल्लेखा'चा योग्य अर्थ कोणता आहे ?
(1) कामामध्ये कशाचा समावेश होतो याचे विधान
(2) काम करण्यासाठी मानवी गरज कशाप्रकारची आहे यांचे विधान
(3) कर्मचाऱ्याने करावयाच्या कर्तव्याचे विधान
(4) कामाच्या सारांशाचे विधान

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

Study CIRCLE

३७) ...... ग्रहणशक्ति चाचण्याबाबत खालील विधाने विचारात घ्या.

अ) एखादे काम करण्यासाठी व्यक्तीकडे असलेली सुप्तशक्तीचे (अव्यक्त बुद्धिसामर्थ्याबाबत) भविष्य वर्तविण्यासाठी ग्रहणशक्ति चाचण्या तयार केल्या जातात

ब) प्रशिक्षणाने प्राप्त केलेल्या क्षमतेच्या मोजमापासाठी ग्रहणशक्ति चाचण्या तयार केल्या जातात

क) अनुभवातून प्राप्त केलेल्या कौशल्याच्या मोजमापासाठी ग्रहणशक्ति चाचण्या तयार केल्या जातात

ड) वागणुकीची शैली ठरविण्यासाठी ग्रहणशक्ति चाचण्या तयार केल्या जातात

आता योग्य विधानाच्या संयोगाची निवड करा.

(1) केवळ (अ) हेच योग्य आहे
(2) (अ) आणि (ब) योग्य आहे
(3) (अ), (ब) आणि (क) योग्य आहे
(4) सर्वच विधाने योग्य आहेत

---

३८) निष्काळजीपणाच्या खटल्यामध्ये निष्काळजीपणामुळे कमी उत्पादन झाले हे दाखविण्यासाठी ......

(1) वस्तुस्थिती आणि परिस्थितीची नोंद ठेवली पाहिजे
(2) जरी केलेले कामकाज (Performance) हे खरोखरच हलक्या प्रतीचे असले तरी ते निष्काळजीपणामुळे आहे हे दाखविले पाहिजे
(3) हलक्या प्रतीचे कामकाज हे निष्काळजीपणामुळे आहे आणि इतर कोणत्याही कारणाने नाही हे दाखविले पाहिजे
(4) वरिष्ठाचे केवळ विधान पुरेसे आहे

---

३९) वारंवार गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे हे वर्तन सुधारण्यासाठी व्यवस्थापनाने खालीलपैकी कोणता मार्ग स्वीकारावा ?

(1) कायदेशीर उपाययोजना करण्यासाठी केस तयार करणे
(2) त्यांची इतर कर्मचाऱ्यांसमोर निर्भर्त्सना करणे
(3) त्यांच्या वैयक्तिक समस्या कोणत्या आहेत यांची माहिती जमवून त्यांना त्या समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन करणे
(4) त्यांची दुसऱ्या दूर असलेल्या खात्यात बदली करणे

---

४०) योग्य उमेदवार निवडताना ''इंटरव्ह्यूइंग''च्या उपयोगात होणाऱ्या चुका कमी करण्यासाठी ......

(1) मुलाखत घेण्यासाठी वापरलेल्या खोलीत अडथळे नसावीत ('प्रायव्हसी' असावी)
(2) मुलाखत घेणाऱ्यांना प्रशिक्षण देऊन मुलाखत घेण्यास तयार करणे
(3) उमेदवारांचा मुलाखतीसाठी वाट पाहण्याचा वेळ कमी करणे
(4) मुलाखत घेणाऱ्यांची संख्या वाढविणे

---

४१) परीक्षेसाठी (Test) योग्य विषय (Theme) शोधून जोड्या लावा.

| परीक्षा | विषय |
|---|---|
| A) योग्यता (Aptitude) | I) मानसिक, यांत्रिक आणि मनोवृत्तिकारक हालचाल |
| B) संपादन करणे (Achievement) | II) आवडी निवडी |
| C) व्यक्तित्व (Personality) | III) कार्याची माहिती व कामाचा नमुना |
| D) रुची/आवड (Interest) | IV) वस्तुनिष्ठ व प्रदर्शनात्मक परिस्थिती |

(1) A-III, B-IV, C-I, D-II
(2) A-I, B-III, C-IV, D-II
(3) A-II, B-III, C-I, D-IV
(4) A-II, B-IV, C-I, D-III

---

४२) पुढीलपैकी कोणती संज्ञा खालील विधानाला संयुक्त ठरते ?

''वागणुकशास्त्रातील संशोधन, व्यक्ती आणि समूह, कर्मचारी आणि मालक, कामगार आणि पर्यवेक्षक यांच्यातील संबंधाविषयी आपले ज्ञान वृद्धिंगत करते. प्रेरणा, उत्पादकता, मानसिक धैर्य, अनुशासन या विषयीच्या कल्पना आता गृहीत मान्यतांच्या फार पुढे गेल्या असून त्यांना आता प्रायोगिक आधार प्राप्त झाला आहे व त्यात वास्तविकता आली आहे.''

(1) सामुदायिक मोजमाप
(2) उद्देशांची एकजूट आणि सराव
(3) प्रबंधनाचे शास्त्र
(4) व्यावसायिक कल

---

४३) औद्योगिक तंट्याच्या दृष्टिकोनातून कार्यमान मूल्यमापन महत्त्वाचे आहे. कारण .......

(1) त्यामुळे औद्योगिक विवाद कमी होतील
(2) त्यामुळे औद्योगिक विवाद वाढतील
(3) कायदेशीर यंत्रणा लेखी कार्यमान मूल्यमापनाचा स्वीकार करतील
(4) कार्यमान मूल्यमापन व औद्योगिक विवाद यांचा काहीही संबंध नाही

---

४४) सर्वसाधारणपणे एखाद्या कामगाराचा वैयक्तिक तंटा हा औद्योगिक कलम कायदा १९४७ खाली औद्योगिक तंटा होऊ शकत नाही परंतु याला काही परिस्थितीमध्ये अपवाद आहे. ती परिस्थिती कोणती ?

(1) कामगाराची बडतर्फी, कामगाराला काढून टाकणे, कामगार कपात किंवा नोकरी संपुष्टात आणणे याच्याशी संबंधित वैयक्तिक तंटे
(2) औद्योगिक कलह कायद्याखालील सत्ताधिकाऱ्यांच्या विचाराधीन असलेले तंटे
(3) बोनससंबंधी तंटे
(4) वेतनासंबंधी तंटे

---

४५) शिस्तभंगाबद्दलच्या कारवाईची सुरुवात कोणी केली पाहिजे ?

(1) विभागीय व्यवस्थापक
(2) नजीकचा वरिष्ठ अधिकारी
(3) व्यवस्थापन
(4) सर्वसाधारण व्यवस्थापक

---

४६) कोरा अर्ज हा ......
(1) जुने, सर्वत्र स्वीकारले जाणारे, अर्जदाराकडून माहिती मिळविण्याचे साधन
(2) आधुनिक, सर्वत्र स्वीकारले जाणारे, अर्जदाराकडून माहिती मिळविण्याचे साधन
(3) सोयीस्कर, सर्वत्र स्वीकारले जाणारे, अर्जदाराकडून माहिती मिळविण्याचे साधन
(4) गैरसोयीचे, स्वीकारले न जाणारे, अर्जदाराकडून माहिती मिळविण्याचे साधन

---

४७) भरती ही प्रक्रिया केव्हा थांबते ?
(1) उमेदवाराच्या ओळख प्रशिक्षणाबरोबर
(2) उमेदवाराच्या निवडीबरोबर
(3) उमेदवाराला प्रत्यक्ष कामावर हजर करून घेतल्यावर
(4) मनुष्यबळ नियोजनानंतर

---

४८) आपल्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांवर प्रभाव पाडण्यासाठी उत्तम पर्याय म्हणजे ......
(1) त्यांना सुरेख भाषण द्यावे
(2) त्यांना समजून द्यावे की त्यांच्यावाचून कामे अडणार नाहीत
(3) त्यांना त्यांच्या कामासंबंधीच्या व वैयक्तिक समस्या सोडवायला मदत करावी
(4) त्यांना मन लावून काम करण्यासंबंधी सांगावे

---

४९) योग्य कर्मचाऱ्यांना बक्षिसे देण्यात होणाऱ्या ''अतिकाटेकोरपणा''च्या चुका (Stringency errors) व ''अतिसौम्यपणा''च्या चुका (Leniency errors) टाळण्यासाठी कोणत्या पद्धतीचा उपयोग करावा ?
(1) फोर्स्ड चोईस मेथड
(2) फोर्स्ड डिस्ट्रिब्युशन मेथड
(3) सिंपल रँकिंग मेथड
(4) मॅन–टू–मॅन कंपॅरिझन मेथड

---

५०) ''शिस्तपालन हा मालकाचा हक्क आहे'' हे विधान ......
(1) बरोबर आहे (2) चूक आहे (3) अंशत: बरोबर आहे (4) अंशत: चूक आहे

---

५१) असे कोणत्या प्रकारचे अर्थसंकल्प आहे की ज्यामध्ये सर्व कृतींचे अंदाजपत्रक करतेवेळी पुनर्मूल्यांकन केले जाते ?
(1) आवर्तनी अंदाजपत्रक
(2) कृती अंदाजपत्रक
(3) शून्याधारित अंदाजपत्रक
(4) लवचीक अंदाजपत्रक

---

५२) खालीलपैकी कोणते विधान अंकेक्षणाचे स्वरूप अचूकपणे वर्णन करते ?
(1) अंकेक्षण म्हणजे हिशेबाची पुस्तके आणि पावत्या यांची तपासणी होय
(2) अंकेक्षण म्हणजे हिशेबीय माहितीची शाबिती
(3) अंकेक्षण म्हणजे आर्थिक माहितीची स्वतंत्रपणे केलेली तपासणी होय
(4) अंकेक्षण म्हणजे माहिती, विवरणपत्रे, लिखित नोंदी इत्यादींची पद्धतशीर व स्वतंत्रपणे केलेली तपासणी होय

---



Study CIRCLE

५३) अंकेक्षणाच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे.

(1) अंकेक्षणाच्या सर्व परिस्थितीत अंकेक्षकाला फक्त अंकेक्षणाच्या संदर्भात पुस्तके व पावत्या याचा पुरावा उपलब्ध असतो

(2) अंकेक्षकासमोर जो प्रस्ताव परीक्षणासाठी आहे, त्याबाबतच अंकेक्षक निर्णायक पुरावा पहात असतो

(3) अंकेक्षण ही व्यावहारिक विद्याशाखा असल्याने त्याला शास्त्रीय उपपत्तीची गरज नसते

(4) अंकेक्षणाच्या संदर्भात पुराव्याची संकल्पना ही मूलभूत आहे

---

५४) शून्याधारित अंदाजपत्रकाचा उपयोग कोठे करतात ? योग्य उत्तर शोधा.

(1) खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील मोठ्या संघटना

(2) खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील मोठ्या संघटना, ज्या नफा मिळवितात किंवा मिळवत नाहीत

(3) उत्पादनाला पूरक उद्योगसंस्था

(4) शासनाच्या सर्व कृती आणि सेवा

---

५५) चांगले अंदाजपत्रक तयार करताना काही मर्यादक घटकांचा विचार आवश्यक असतो कारण ......

(1) अंदाजपत्रक बजेट ऑफिसरच्या मानाचा मुद्दा बनतो

(2) हा यथायोग्य/व्यवहार्य दृष्टिकोन आहे

(3) हे मुख्य घटकांचा विचार करणे होय

(4) औषधापेक्षा प्रतिबंधात्मक उपाय योग्य असतो

---

५६) खाली दिलेल्या विविध पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधान पूर्ण करा.
लेखा परीक्षणांचा प्राथमिक साध्या स्वरूपातील प्रारंभ होण्याचे कारण ...... हे आहे.

(1) मोठ्या प्रमाणावरील व्यवसायांचा उदय

(2) मालकी व व्यवस्थापन यातील फारकत

(3) दुसऱ्याच्या वतीने रोख रकमेचे व्यवहार करण्यासाठी व त्यांच्या नोंदी ठेवण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तींचा प्रामाणिकपणा व विश्वासार्हता यावर नियंत्रण ठेवण्याची गरज

(4) चुका शोधण्याची गरज

---

५७) प्रमंडळाचा स्थिर खर्च १६,५०० रु. आहे. प्रमंडळ उत्पादित करीत असलेल्या उत्पादनाचा बदलता खर्च प्रत्येक नगाला १० रु. आहे. नगाची विक्री किंमत २० रु. असल्यास व वार्षिक विक्री ३,००० नगांची असल्यास समविघटन बिंदू कोणता असेल ?

(1) रु. ३३,००० (2) रु. ५०,००० (3) रु. ३०,००० (4) रु. ६०,०००

---

५८) खालीलपैकी कोणत्या दोन बाबींना सरकारी लेखा परीक्षणात जास्त भर दिलेला असतो ?

अ) नोंदीची अचूकता

ब) व्यवहारांची विविध मथळ्याखाली वर्गवारी

क) खर्चाची अचूकता

ड) कार्यपद्धती व नियंत्रणाची पूर्तता

(1) (अ) आणि (ब) (2) (क) आणि (ड) (3) (अ) आणि (क) (4) (ब) आणि (क)

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

५९) आर्थिक व्यवस्थापकांच्या योग्य 'A' ने सुरू होणाऱ्या गरजा कोणत्या ?

(1) Anticipation, acquisition, allocation, assessment and appropriation
(2) Acceptance, absorption, action, additions, accuracy
(3) Anticipation, accuracy, action, allocation, additions
(4) Acceptance, acquisition, absorption, assessment, appropriation


---

६०) सातत्याने येणाऱ्या रोकड प्रवाहाचे विशिष्ट दराने भविष्यातील वृद्धीत मूल्य काढले तर त्यास काय म्हणतात?

(1) वर्तमान मूल्य
(2) समय मूल्य
(3) कालान्त किंवा समयान्त मूल्य (Terminal value)
(4) निव्वळ वर्तमान मूल्य

---

६१) खालील नेटवर्क आकृतिबंध अभ्यासा –




ह्या प्रकल्पास पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल ?

(1) ११ दिवस
(2) १८ दिवस
(3) २० दिवस
(4) पुढीलपैकी कोठलाही पर्याय बरोबर नाही


---

६२) क्रिटिकल मार्ग म्हणजे ......

(1) प्रकल्पास लागणारा जास्तीतजास्त वेळ
(2) प्रकल्पास लागणारा कमीतकमी वेळ
(3) प्रकल्पास लागणारा सरासरी वेळ
(4) वरीलपैकी कोणतेही बरोबर नाही

---

६३) प्रथम खालील नेटवर्क पहा –




खालील मधून योग्य पर्याय शोधा.

(1) 'झ' ही क्रिया 'य' ही क्रिया संपल्यावरच सुरू व्हायला हवी
(2) 'झ' ही क्रिया 'य' आणि 'क्ष' या क्रिया संपल्यानंतरच सुरू व्हायला हवी
(3) 'झ' ही क्रिया 'क्ष' आणि 'य' ह्या क्रियांवर अवलंबून नाही
(4) 'क्ष' आणि 'य' या क्रिया 'झ' ही क्रिया संपेपर्यंत सुरू होऊ शकत नाहीत

---

६४) एका क्रियेला खालीलप्रमाणे वेळ लागतो –
उत्साहजनक वेळ – ५ तास
निराशाजनक वेळ – १३ तास
सर्वसाधारण वेळ – ६ तास
म्हणून ह्या क्रियेला लागणारा सरासरी वेळ नेटवर्कसाठी खालील असावा
(1) ६ तास (2) ९ तास (3) ७ तास (4) ५ तास

---

६५) खालील पर्याय तपासा –
अ) जेथे क्रियांना लागणारा वेळ अनिश्चित असतो, तेथे PERT. तंत्रज्ञान उपयुक्त ठरते
ब) जेथे क्रियांना लागणारा वेळ निश्चित असतो, तेथे CPM तंत्रज्ञान वापरतात
(1) ‘अ’ बरोबर आहे परंतु ‘ब’ चूक आहे
(2) ‘ब’ बरोबर आहे परंतु ‘अ’ बरोबर नाही
(3) ‘अ’ आणि ‘ब’ दोन्ही बरोबर आहेत
(4) ‘अ’ आणि ‘ब’ दोन्ही चूक आहेत

---

६६) कंत्राटासाठी प्रमाणित अटी भारतातील एका संस्थेने ठरविल्या आहेत, त्या मुख्य संस्थेचे नाव सांगा –
(1) इन्स्टिट्यूट ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स
(2) इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिकल इंजिनिअर्स
(3) असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग इंजिनिअर्स
(4) नॅशनल असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग इंजिनिअर्स

---

६७) प्रकल्प नियोजनात परदेशी सहभाग सरकारी धोरणावर अवलंबून असतो, त्यात ...... ही गोष्ट धरलेली असते.
(1) परदेशी तंत्रज्ञानाची गरज व रॉयल्टी पेमेंट
(2) परदेशी सहभाग कराराच्या अटी
(3) परदेशी गुंतवणूक
(4) वरील सर्व एकत्रितपणे

---

६८) प्रकल्पाच्या अपयशाची कारणे कोणती ?
अ) प्रकल्प नियोजनकारांचा अवाजवी आशावाद
ब) प्रकल्प अंमलबजावणीतील अवाजवी अंदाज
क) अनपेक्षित विरोध व संकटे
ड) अकार्यक्षम प्रशासकीय पद्धती
(1) (अ) बरोबर आहे
(2) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत
(4) वरील सर्व बरोबर आहेत

---

६९) प्रकल्प तयार करण्यासाठी खालीलपैकी कोणत्या बाबींचा विचार करणे आवश्यक असते ?
अ) लोकांचे कौशल्य व कार्यक्षमता
ब) शासकीय निधी व अनुदानाचा फायदा
क) विकासात्मक पायाभूत सोयींची उपलब्धता
ड) दूरदर्शन मालिकांचा अभ्यास
(1) (अ) एकटेच बरोबर आहे
(2) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत
(4) सर्व चूक आहेत

---

७०) प्रकल्पाच्या परतफेडीचा अल्पकाळ म्हणजेच ......
अ) प्रकल्प खूप फायदेशीर आहे
ब) नफ्याबाबत अनिश्चितता आहे
क) रोखीकरण स्थिती कशी राहील हे व्यक्त करणे ही एक अत्यंत असंभाव्य बाब होय
ड) (ब) आणि (क) चे एकत्रीकरण
(1) (अ) एकच बरोबर आहे
(2) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत
(4) (ड) हे बरोबर आहे

---

७१) सुमारे १००० यात्रेकरू असलेल्या एका तंबूला आग लागली. बरेच जण मृत्युमुखी पडले. भविष्यकाळात जीवितहानी होऊ नये म्हणून कोणत्या प्राथमिक योजनांची गरज लागते ?
(1) यात्रेकरूंची पक्क्या घरात सोय करावी
(2) त्वरित पोलीस सहाय्य मिळावे म्हणून तंबूजवळ दूरध्वनीची व्यवस्था करावी
(3) अशा तंबूला खूप दरवाजे ठेवावेत
(4) तंबूजवळ पोलीस स्टेशनची व्यवस्था करावी

---

७२) लोकसंख्यावाढीला आळा घालण्यासाठी लांब पल्ल्याचे सर्वात चांगले धोरण कोणते ?
अ) प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रबोधन घडवून आणणे
ब) संतती नियमनाची साधने सहज उपलब्ध करून देणे
क) संतती नियमनाच्या शस्त्रक्रिया व गर्भपात मोफत करवून देणे
(1) फक्त (अ)
(2) (अ), (ब) व (क) एकत्रित
(3) (ब), (क) व (ड) एकत्रित
(4) (ड) सर्व एकत्रित

---

७३) शहरातील व्यापारी भागात वाहतूक अडवून राहू नये म्हणून योजावयाचा सर्वात परिणामकारक मार्ग म्हणजे ......
अ) व्यापारी विभाग शहरात अनेक ठिकाणी विभागणे
ब) स्वत:ची वाहने शहरात ठरावीक मर्यादेपुढे आणण्यास लोकांना बंदी करणे
क) कार्यक्षम नागरी वाहतूक यंत्रणा उभारणे
ड) रस्ते रुंद करून त्यावर वाहने उभी करण्यास बंदी करणे
(1) फक्त (अ)
(2) (ब) आणि (क) एकत्र
(3) सर्व एकत्र
(4) फक्त (ड)

---

७४) नवीन झोपडपट्ट्या होऊ नयेत यावर सर्वात परिणामकारक मार्ग कोणता ?
(1) नवीन मोठे कारखाने मोठ्या शहरात व शहराभोवतीच्या ५० कि.मी. पर्यंतच्या भागात सुरू करण्यास बंदी करणे
(2) नवीन झोपडपट्ट्या सुरू होऊ नयेत म्हणून ''दक्ष गट'' (vigilance squad) ठेवणे
(3) जेथे झोपडपट्टी होण्याची शक्यता वाटते, तेथील वीज, पाणी वगैरे सुविधा थांबविणे
(4) नव्या औद्योगिक वसाहती ग्रामीण भागात सुरू करणे

---

७५) ज्या क्षेत्रांना भूकंपाचे भय आहे अशा क्षेत्रात भविष्यात होऊ शकणारी हानी टाळण्यासाठी सर्वात परिणामकारक उपाय म्हणजे –
(1) अशा क्षेत्रात नवे कारखाने व बांधकामे यांना बंदी घालावी
(2) शास्त्रीय माहितीवर आधारित सूचनापुस्तक अशा क्षेत्रातील लोकांना वाटावे
(3) भूकंप झाला तर कसे वागावे याचे शैक्षणिक प्रयोग (mock exercises) आखावेत
(4) वर दिलेल्या तीनही गोष्टी कराव्यात

---

७६) १९९१ च्या जनगणनेनुसार मुंबईची लोकसंख्या स्थूल मानाने किती आहे ?
(1) ७० लाख (2) ९० लाख (3) १ कोटी (4) १.१५ कोटी

---

७७) भारतात रेल्वे वाहतूक प्रथम कोणत्या शहरादरम्यान व कधी सुरू झाली ?
(1) हावरा ते पाटणा १८३८ (2) मुंबई ते ठाणे १८५३
(3) मुंबई ते ठाणे १८०९ (4) दिल्ली ते आग्रा १८३४

---

७८) इमारतीमध्ये किती उंचीपेक्षा जास्त उंचीसाठी लिफ्ट बसविणे आवश्यक आहे ?
(1) १० मीटर (2) १५ मीटर (3) २१ मीटर (4) २४ मीटर

---

७९) मुंबईतील झोपडपट्टी वासियांना खाजगीक्षेत्रातून मोफत पक्की घरे देण्याची योजना मुख्यत: कोणत्या संकल्पनेवर आधारित आहे ?
(1) झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्विकास (2) वाढीव बांधकाम क्षेत्र निर्देशांक
(3) झोपडपट्टी पुनर्वसन (4) शासकीय अनुदान

---

८०) उड्डाणपुलामुळे वाहतुकीचे कोणत्या बाबतीत वर्गीकरण होते ?
(1) दिशा (2) पातळी (3) वेग (4) वाहनांना वर्ग

---

८१) राष्ट्रीय महामार्ग बांधताना बांधीव मार्गाची किमान रुंदी किती असावी ?
(1) १८ मीटर (2) १२ मीटर (3) ३० मीटर (4) २४ मीटर

---

८२) वाहतूक नियोजन करताना वाहतुकीची वर्दळ कोणत्या परिमाणात साधारणपणे मोजली जाते ?
(1) हळू व अतिवेगाने जाणाऱ्या वाहनांची बेरीज (2) वाहक कार परिमाण
(3) सर्व वाहनांची बेरीज (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

८३) नगररचना शास्त्रात भूवापराची घनता नियोजित करण्यासाठी कोणते परिमाण वापरले जाते ?
(1) गाळे प्रति हेक्टर (2) लोकसंख्या प्रति हेक्टर
(3) बांधकाम क्षेत्र निर्देशांक (4) वरील सर्व

---



Study CIRCLE

८४) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार शहराची विकास योजना तयार करणे हे कोणाचे आवश्यक कर्तव्य आहे ?
(1) नगररचना अधिकारी
(2) संबंधित महानगरपालिका/नगरपालिका
(3) सिडको
(4) राज्य शासनाचा नगरविकास विभाग

---

८५) अकृषिक परवानगी कोणाकडून घ्यावी लागते ?
(1) नगरपालिका
(2) जिल्हा परिषद
(3) नगररचना विभाग
(4) वरीलपैकी कोणीही नाही

---

८६) इमारतीची अनुज्ञेय उंची ही बाब कशाशी निगडित आहे ?
(1) भूखंडाचे क्षेत्र
(2) समोरील रस्त्यांची रुंदी
(3) समोरील रस्त्यांची रुंदी आणि पुढील सामासिक अंतर
(4) भूखंडाची खोली

---

८७) सार्वजनिक उपक्रमासाठी भूसंपादन कायद्यान्वये जमीन संपादन करताना नुकसान भरपाई कशाच्या आधारे ठरविली जाते ?
(1) सद्यःस्थितीतील वापरांनुसार जमिनीची किंमत
(2) जमिनीची शासनाने ठरविलेली किंमत
(3) वर्तमान बाजारमूल्य
(4) भविष्यातील बाजारमूल्य क्षमता

---

८८) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार नगररचना योजना कोणत्या उद्दिष्टांसाठी केली जाते?
(1) रस्त्यांचा विकास
(2) मूलभूत नागरी सुविधांचे नियोजन
(3) विकास योजनेची अंमलबजावणी
(4) वरील सर्व

---

८९) कोणता अधिकारी नगररचना योजनेचा अंतिम निवाडा ठरवितो ?
(1) नगररचना अधिकारी
(2) लवाद
(3) विशेष भूसंपादन अधिकारी
(4) राज्य शासन

---

९०) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमान्वये विकास योजना सुधारित करण्याचा कालावधी किती आहे ?
(1) ५ वर्षे
(2) १० वर्षे
(3) १५ वर्षे
(4) २० वर्षे

---

९१) भारताच्या राज्यघटनेतील 'मूलभूत हक्क' या प्रकरणाचे खालीलप्रमाणे चांगले वर्णन करण्यात आले आहे ......
(1) भारताचा 'मॅग्ना चार्टा'
(2) भारताची 'भगवद् गीता'
(3) भारताचे 'बायबल'
(4) भारताचे 'बिल ऑफ राईटस'

---

९२) खालील विधान दिलेल्या उत्तरांतील एका उत्तराच्या आधारे पूर्ण करा.
''कायद्याचा काही भाग घटनाबाह्य आहे असे घोषित झाल्यास ......''
(1) तो संपूर्ण कायदा व्यर्थ ठरतो
(2) फक्त ती प्रतिकूल तरतूद व्यर्थ समजली जाते
(3) तो संपूर्ण कायदा व्यर्थ समजला जातो
(4) तो कायदा कार्यान्वित केला जात नाही

---

९३) एखादा नागरिक आपल्या मूलभूत हक्कांचा त्याग करू शकतो काय ?

(1) होय
(2) नाही
(3) या विषयावर राज्यघटना स्तब्ध आहे
(4) हे न्याययंत्रणेवर सोडले आहे

---

९४) न्यायतत्त्वशास्त्र (Jurisprudence) म्हणजे ......

(1) ... न्यायाधीशाचे चातुर्य
(2) ... कायद्याचे ज्ञान
(3) ... चतुर मनुष्याचा कायदा
(4) ... कायद्याचे शास्त्र

---

९५) वाक्य पूर्ण करा.
शिक्षा/सजा ...... असली पाहिजे.

(1) नुकसानीपेक्षा जास्त
(2) गुन्ह्याच्या गांभीर्याच्या प्रमाणात
(3) धाक वाटावा यासाठी नेहमीच जास्त प्रमाणात
(4) प्रेम आणि आपुलकीवर आधारित

---

९६) हिंदू वारसा कायदा कोणास लागू होतो ?
अ) जो धर्माने हिंदू आहे
ब) जो बुद्ध, जैन अथवा शीख धर्मीय आहे
क) जो मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी अथवा ज्यू धर्माचा नाही

(1) फक्त (अ) बरोबर आहे
(2) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
(3) (अ) आणि (क) बरोबर आहेत
(4) सर्व उत्तरे बरोबर आहेत

---

९७) मुस्लीम कायद्यातील तरतुदीनुसार खालील व्यक्ती पोटगी मागू शकतात.
अ) पत्नी ब) मूल क) आई – वडील ड) गरीब नातेवाईक

(1) फक्त (अ) बरोबर आहे
(2) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत
(4) सर्व बरोबर आहेत

---

९८) वाक्य पूर्ण करा –
''जथे समान समानता असेल ......''

(1) तेथे समानता अस्तित्वात नसते
(2) शेवटची समानता टिकून राहते
(3) कायद्याचे प्राबल्य असते
(4) समानता अस्तित्वात रहाते

---

९९) 'साम्य जुलूम थोपविते' हे खालीलपैकी कोणत्या उदाहरणावरून स्पष्ट होते ?

(1) निवडणूक
(2) न्याय
(3) दंड व जप्ती
(4) नुकसान भरपाई

---

१००) 'कायद्याचे काही तोटे असतात' हे विधान ......''

(1) बरोबर आहे
(2) चूक आहे
(3) चकवणारे आहे
(4) काल्पनिक आहे

---

□□□

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

Study Circle

**Answers**

१) खालीलपैकी कोणते शासकीय नियंत्रण तंत्र महानगरपालिकेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वाधिक योग्य आणि लोकशाही स्वरूपाचे आहे ?

(1) मनपा मंडळ बरखास्ती
(2) महापौरांची बडतर्फी
(3) सल्ला व माहिती देणे
(4) स्थानिक कृतींसाठी पूर्वसंमतीची अट

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–३ | २–३ | ३–२ | ४–४ | ५–२ | ६–१ | ७–२ | ८–४ | ९–४ | १०–३ |
| ११–४ | १२–४ | १३–३ | १४–१ | १५–४ | १६–१ | १७–२ | १८–२ | १९–३ | २०–३ |
| २१–४ | २२–३ | २३–१ | २४–२ | २५–१ | २६–२ | २७–४ | २८–१ | २९–३ | ३०–२ |
| ३१–३ | ३२–१ | ३३–४ | ३४–१ | ३५–३ | ३६–२ | ३७–१ | ३८–२ | ३९–३ | ४०–२ |
| ४१–१ | ४२–३ | ४३–१ | ४४–१ | ४५–२ | ४६–४ | ४७–१ | ४८–३ | ४९–३ | ५०–१ |
| ५१–२ | ५२–४ | ५३–१ | ५४–२ | ५५–२ | ५६–४ | ५७–१ | ५८–२ | ५९–१ | ६०–१ |
| ६१–१ | ६२–२ | ६३–३ | ६४–३ | ६५–३ | ६६–४ | ६७–४ | ६८–४ | ६९–३ | ७०–१ |
| ७१–ु | ७२–४ | ७३–३ | ७४–२ | ७५–४ | ७६–३ | ७७–२ | ७८–२ | ७९–२ | ८०–३ |
| ८१–२ | ८२–२ | ८३–३ | ८४–४ | ८५–४ | ८६–३ | ८७–३ | ८८–४ | ८९–२ | ९०–४ |
| ९१–१ | ९२–१ | ९३–३ | ९४–४ | ९५–२ | ९६–४ | ९७–३ | ९८–४ | ९९–२ | १००–१ |